उलटतपास प्रतिवादी नं. १ व २ तर्फे अॅड. श्री. जी.के. आंबेकर यांचे तर्फे

दि.१९.७.१९९० रोजीच्या करारात मिळकतीच्या चतु:सीमा लिहिल्या आहेत अगर कसे हे मला माहित नाही. ज्या दिवशी करार केला त्यादिवशी दावा मिळकतीचा ७/१२ उतारा मी पाहिला होता. त्यावेळी दावा मिळकतीचे क्षेत्राला प्रतिवादी क्र. १ व त्यांचे भावाचे नाव नोंद होते. परंतु त्यांचे भावाचे नाव मला आता आठवत नाही. ७/१२ चे इतर हक्कात प्रतिवादी क्र. १ यांचे आईचे व बहिणीचे नावाची नोंद होती. दावा मिळकत ही प्रतिवादी यांची वडीलार्जित मिळकत आहे. मूळ मिळकत ही श्रीधर खंजिरे याचे नावे होती. श्रीधर मयत झालेनंतर वारसा हक्काने दावा मिळकत प्रतिवादीकडे आली. कराराचेवेळी करारपत्रावर प्रतिवादी यांची आई व बहिण यांच्या सहया घेतल्या नाहीत. प्रतिवादी क्र. २ यांची जन्मतारीख मला माहिती नाही. प्रतिवादी क्र. २ ची जन्मतारीख दि. ५.६.१९७३ अशी आहे अगर कशी याची मला माहिती नाही. करारादिवशी प्रतिवादी क्र. २ हे अज्ञान होते किंवा कसे याची मला माहिती नाही. या करारपत्रासाठी लागणारा स्टॅप हा प्रतिवादी यांनी आणला होता. तो स्टॅप कोणी आणला हे मला आता आठवत नाही. किती रुपयाचा स्टॅप होता हे मला आता आठवत नाही. सदर स्टॅपवर देशपांडे यांनी मजकूर लिहिला. हे खरे नाही की तथाकथित करारावर प्रतिवादी यांच्या सहया नाहीत.

बापू खंजिरे वगैरे यांचेकडून त्यांचे हिश्याची जमीन खरेदी करताना कुळ कायदयाचे परवानगीसाठी लागणारी आवश्यक सर्व कागदपत्रे मी पाहिली होती. सन १९८९ साली दावा मिळकतीचे गट नंबरवर धरण प्रकल्पासाठी संपादित असा शेरा लिहिला होता अगर कसे हे मला आठवत नाही. कूळ कायदयाची परवानगी देणा—या अधिका—याने सदरचा गट नंबर हा धरण प्रकल्पासाठी संपादित आहे हे मला सांगितले अगर कसे मला आठवत नाही.

करार करताना खरेदीखतासाठी लागणारी परवानगी प्रतिवादी यांनी थोडया दिवसात आणून देतो असे मला सांगीतले होते. तथाकथित कराराचे पूर्ततेसाठी लागणारी परवानगी आणली का असे मी प्रतिवादी यांना लेखी

कळवून विचारले नाही. हे खरे नाही की माझा व प्रतिवादीचा लेखी करार झाला नसल्याने मी त्यांना परवानगीबाबत कधीही लेखी विचारले नाही. वारणा प्रकल्पाकडे मी कधी चौकशी केली ते मला आठवत नाही.

**पुढील उलटतपास पुढील तारखेपर्यत तहकुब.**

जबाब माझे समक्ष नोंदवला.

दि. १३.०६.२०१९

श्रवणोत्तर स्विकृत.

(ए.बी.रेडकर)

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, जयसिंगपूर.